RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १२, अंक - २ ] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १२ - १८, २०२३/ पौष २२ - २८, शके १९४४ [ पृष्ठे १२६

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय / संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### लवाद, नगर रचना योजना यांजकडून

*जाहीर प्रकटन*

क्रमांक नरयो/मांजरी खुर्द-कोलवडी क्र. ११/३/२०२२.— महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ मधील नियम, १३ अन्वये याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील सही करणाऱ्यांनी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ७२ *(३) (४) (५) (७)* अन्वये मंजूर प्रारूप नगर रचना योजना-मांजरी खुर्द-कोलवडी क्रमांक ११ च्या मसुद्यावर अनुसरून नगर रचना योजना, मांजरी खुर्द-कोलवडी क्रमांक ११ (प्रारूप प्राथमिक) योजना तयार केलेली आहे. वरील प्रारूप प्राथमिक योजना आज मंगळवार दिनांक १० जानेवारी २०२३ रोजी या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर प्रारूप प्राथमिक नगर रचना योजना, लवाद, नगर रचना योजना, मांजरी खुर्द-कोलवडी क्रमांक ११, यांचे ५ वा मजला, पीएमआरडीए प्रशासकीय इमारत, आकुर्डी, पुणे-४११ ०४४ (ई-मेल पत्ता *arbitrator.pmr 1@rediffmail.com*) येथील कार्यालयात तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे आकुर्डी, पुणे-४११ ०४४ येथील कार्यालयात कार्यालयीन वेळेत जनतेला अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सदर प्रारूप प्राथमिक नगर रचना योजना तयार करताना, कलम ७२ *(४)* प्रमाणे आवश्यक कार्यवाही करून, लवाद यांनी शासन मंजूर प्रारूप नगर रचना योजना, मांजरी खुर्द कोलवडी क्रमांक ११ च्या मसुद्यामध्ये जमिनीच्या/मूळ भूखंडाच्या आणि त्यांच्या अंतिम भूखंडाच्या मालकी हक्कामध्ये/हितसंबंधामध्ये प्रस्तावित केलेले बदल जमीनधारकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे नगर रचना योजना, मांजरी खुर्द-कोलवडी क्रमांक ११ (प्रारूप प्राथमिक) या योजनेतील सर्व भूखंडाबाबतचे लवादाचे निर्णय सर्व हितसंबंधित व्यक्तींना नमुना ४ *(अ)* मध्ये स्वतंत्रपणे कळविण्यात येत आहेत.

आता, कलम ७२ *(५)* मधील तरतुदींप्रमाणे, लवाद यांच्याकडून सदरहू प्रारूप प्राथमिक नगर रचना योजना, मांजरी खुर्द-कोलवडी क्रमांक ११ ही शासनाकडे, उक्त अधिनियमाच्या कलम ८६ अनुसार मंजुरीसाठी सादर करण्यात आलेली आहे.

**शिवराज जी. पाटील,**
लवाद,
नगर रचना योजना,
मांजरी खुर्द-कोलवडी क्रमांक ११,
आकुर्डी, पुणे.

पुणे, १० जानेवारी २०२३.

---

## BY ARBITRATOR, TOWN PLANNING SCHEME

### *Public Notice*

No. TPS/Manjri Khurd-Kolwadi No. 11/3/2023.–It is hereby notified as required by Rule 13 of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974, that the undersigned has on this Tuesday, the 10th January 2023, has published the Town Planning Scheme, Manjri Khurd - Kolwadi No.11 (Draft - Preliminary) in respect of the Sanctioned Draft Town Planning Scheme, Manjri Khurd - Kolwadi No.11, as drawn up under the provisions of Section 72 *(3) (4) (5) (7)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

The Draft Preliminary Town Planning Scheme as drawn up by him, is kept open for inspection of the public during office hours on all working days in the office of the Arbitrator, Town Planning Scheme, Manjri Khurd - Kolwadi No.11 (address - 5th Floor, PMRDA Administrative Building, Akurdi, Pune - 411 044) (E mail address - *arbitrator.pmr1@rediffmail.com*) and also in the office of the Pune Metropolitan Region Development Authority, Akurdi, Pune - 411 044.

The changes as proposed by the Arbitrator in the sanctioned draft Town Planning Scheme, Manjri Khurd - Kolwadi No.11, as provided in Section 72 *(4)* of the said Act, while framing draft Preliminary Town Planning Scheme, Manjri Khurd - Kolwadi No.11, in regard to the allotment of lands/ original plots and/or ownership interest in the final plots are published for information of the interested persons.

Relevant decisions of the Arbitrator in respect of the plots within the said draft Preliminary Town Planning Scheme Manjri Khurd - Kolwadi No.11, are being communicated to all the concerned interested parties in Form 4A independently.

Now, this draft Preliminary Town Planning Scheme - Manjri Khurd - Kolwadi No.11, has been submitted as per Section 72 *(5)* by the Arbitrator to the Government for sanction under Section 86 of the said Act.

**SHIVRAJ G. PATIL,**
Arbitrator,
Town Planning Scheme,
Manjari Khurd-Kolwadi No. 11,
Akurdi, Pune.

Pune, 10th January 2023.

---

## सदस्य-सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना यांजकडून

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

### *सूचना*

क्रमांक प्रा. यो. पुणे/कलम २० *(३)*/मौजे पाचाणे, ता. मावळ/ग. नं. ३८३ व इतर/सहसंपुवि-५१/२०२३.--ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे), मधील तरतुदीनुसार पुणे जिल्ह्याची प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) शासनाने दिनांक २५ नोव्हेंबर १९९७ रोजी मंजूर केली असून, ती दिनांक १० फेब्रुवारी १९९८ पासून अमलात आलेली आहे आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौजे पाचाणे, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथील गट नंबर ३८४, ३८५, ३८८ पै. व ३८९ या जमिनी शेती तथा ना-विकास विभागात समाविष्ट असून गट नंबर ३९१, ३९२ पै., ३९३ व ३९४ पै. या जमिनी वनीकरण विभागात समाविष्ट असून, गट नंबर ३८३ पै., ३९० या जमिनी भागश: शेती व भागश: वनीकरण असल्याने त्या विभागातून वगळून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्याबाबत मे. रविराज ग्लुकोज प्रा. लि. तर्फे संचालक श्री. राजेंद्र लक्ष्मण पवार व इतर यांनी दिनांक ८ सप्टेंबर २०२१ रोजी शासनास विनंती केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१५/प्र. क्र. ४९/१५/नवि-१३, दिनांक ६ मे २०१५ व दिनांक ४ जानेवारी २०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत (यापुढे ज्यास "उक्त शासन निर्णय" असे संबोधले आहे) व त्याअनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठित केली आहे ;